माहितीचा
अधिकार

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
३ रा मजला, ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट,
जे एन हेराडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्रमांक : ०२२-२२६२२०३६ इ-मेल : jd.kosh@mahakosh.in

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन ज्ञापन क्र. -१११/प्र क्र १४९/कोषा-१/विचौसुसा दि. २०.१०.२०११
२. शासन आदेश वित्त विभाग क्रमांक विभाची-१११/ प्र क्र १४९/कोषा-१/विचौसुसा दि. २०.०४.२०१७
३. संचालनालयाचे आदेश क्र. संलेको/ गोअकक्ष/स.अ.१/वेनि/नेविकोंगळे/०९-२०१७/४१०/४१२४ दि. ५ ऑक्टोबर २०१७
४. शासन वित्त विभाग अधिसूचना क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९,दि. २२.०४.२००९

क्र.संलेको ०८.१८/स.अ.१/वे.वा.जुलै २०१७-२०१८/उपसंचालक / नेविकोंगळे/गोअक/ 09L

18 JAN 2019

## आ दे श

संदर्भाकित पत्र १ च्या आदेशान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या उपसंचालक संवर्गातील, श्री नेताजी विश्वनाथ कोंगळे, तत्कालीन सहाय्यक संचालक, महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांच्या विरुध्द म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती. संदर्भ क्र २ अन्वये श्री कोंगळे यांना "म.ना.से (शिस्त व अपिल) नियम ५ (१) (चार) यामधील तरतूदीनुसार श्री कोंगळे यांचे वेतन एक टप्प्याने दोन वर्षाकरिता खाली आणण्यात यावे. सदर काळातील वेतनवाढी त्यांना देय राहतील, सदर शिक्षेचा त्यांच्या सेवानिवृत्तीवेतनावर परिणाम होणार नाही" अशी शिक्षा बजावण्यात आली आहे. सदर शिक्षा आदेशाच्या अनुषंगाने संदर्भ क्र ३ अन्वये श्री कोंगळे यांची सुधारित वेतननिश्चिती करण्यात आली. त्यानुसार श्री कोंगळे यांचे वेतन दि. २०.०४.२०१७ ते दि. २०.४.२०१९ या दोन वर्षाकरिता एक टप्पा खाली आणण्यात आले होते.

श्री कोंगळे हे नियत वयोमानानुसार दि ३१.५.२०१९ (म.नं) रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणार आहेत. यास्तव संदर्भ क्र २ च्या शिक्षा आदेशानुसार श्री कोंगळे यांच्या दोन वर्षाकरिता रोखलेल्या वेतनवाढीची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

| दिनांक | मूळ वेतन | ग्रेड वेतन | शेरा |
|---|---|---|---|
| ०१.०७.२०१५ | २७७६० | ६६०० | शिक्षेपूर्वीचे वेतन |
| ०१.०७.२०१६ | २८७९० | ६६०० | |
| ०१.०७.२०१७ | २९८६० | ६६०० | |
| ०१.०७.२०१८ | ३०९६० | ६६०० | |
| दिनांक ३१.५.२०१९ (म.नं) सेवानिवृत्त | | | |

संदर्भ क्र २ च्या शिक्षा आदेशानुसार, उपरोक्तप्रमाणे परिगणना केलेल्या पूर्वीच्या वेतनवाढीच्या परिणामी, श्री कोंगळे यांना दि. १.७.२०१७ ते दि २०.४.२०१९ या कालावधीतील थकबाकी देय राहणार नाही . परंतु सदर वेतनवाढीनुसार त्यांच्या सेवानिवृत्तीप्रकरणी लाभ देय राहतील.

(ज.र.मेनन)
संचालक
लेखा व कोषागारे, मुंबई

D:\lenovo backup 2\Neeta Imp\वार्षिक वेतनवाढ सन 2018\Final\Deputy Director 01.07.2018_2.odt

प्रत माहितीस्तव :

१. संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे पदावरील विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, सदर आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावरील Orders & Circulars या मथळयाखाली उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरण्यात यावी.

२. अंतर्गत राजपत्रित शाखा

३. संबंधित अधिकारी

३. निवडनस्ती